# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## अ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक ०२

दिनांक :-१६/११/२०२१ वेळ:- सकाळी ११.३० वाजता

........................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०२१ ची मासिक सभा मंगळवार दिनांक १६/११/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

कार्यपत्रिका क्रमांक ७ दिनांक १०/०८/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणे.

कार्यपत्रिका क्रमांक ०१ दिनांक २९/१०/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती विशेष सभेचा (सभापती निवड) सभावृत्तांत कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचे दिनांक २१/०९/२०२१ रोजीचे पत्र. प्रभाग क्रमांक १० मधील मोरवाडी सेंट्रल मॉल मागे २ जुने वाचनालय आहेत व ते खूप दिवसांपासून बंद देखील आहेत. तेथे रात्रीच्या वेळी मुले मुली थांबलेली असतात व तेथे चुकीचा प्रकार घडत आहे. तेथील नागरिकांनी तक्रार केली आहे. त्या अनुषंगाने सदरची २ जुनी वाचनालये हटविण्याचे प्रस्तावास मान्यता देणे. |
| विपय क्रमांक २ | सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचे दिनांक २९/०९/२०२१ रोजीचे पत्र प्रभाग क्रमांक १० मधील मोरवाडी गावठाण परिसरामध्ये अनेक वर्षापासून शौचालय पूर्णपणे खराब व दुर्बल अवस्थेत झाले आहेत. त्या ठिकाणी सध्या खूप दुर्गंधी होत असल्याने सदर ठिकाणातील नागरिकांना खूप त्रास होत आहे. तरी तेथील ते शौचालय पाडून त्या ठिकाणी नवीन शौचालय बांधले तर सर्व नागरिकांना उपयोगी ठरेल. तरी तेथील शौचालय पाडून नवीन शौचालय बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणे. |
| विषृय क्रमांक ३ | सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचे दिनांक १/११/२०२१ रोजीचे पत्र. प्रभाग क्रमांक १९ मध्ये पिंपरी मेन बाजार पेठ बी ब्लॉक ४ पासून ३१ पर्यंत महानगरपालिकेच्या काही जागा बंद अवस्थेत आहेत व महापालिकेचे सार्वजनिक संडास बाथरुम व मुतारी या देखील बंद आहेत त्या ठिकाणी काही स्थानिक नागरिक जागा बंद असल्या कारणाने व बंद असलेले संडास बाथरुम तोडून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे स्थापत्य विभागांतर्गत त्या बंद जागा विकसित कराव्यात व बंद संडास तोडून त्या जागेवर महानगरपालिकेचे आरोग्य कार्यालय, जेष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र व नागरिकांसाठी धर्मशाळा बनविणेचे प्रस्तावास मान्यता देणे. |

मा. सभापती यांचे संमत्तीने/परवानगीने ऐन वेळचे विषय दाखल करुन  घेणे.

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती,निगडी-४४.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी- ४४.
क्रमांक:- अक्षेका/९/कावि/ ९३ /२०२१     दिनांक:-११/११/२०२१

प्रत- कार्यालयीन नोटीस बोर्ड प्रसिध्दीसाठी.